वसमत पंचायत समिती (जि. हिंगोली) नवीन प्रशासकीय इमारत बांधकामास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंसई-२०१३/प्र.क्र.२३७/बांधकाम-४
मर्झबान पथ, २५ बांधकाम भवन,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
दिनांक: २६ मार्च, २०१८

वाचा :-

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., हिंगोली याचे क्र.जिपहिं/बांध/ताशा-१/१३८२/ २०१३, दि.०३.०७.२०१३.

२) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., हिंगोली याचे क्र.जिपहिं/बांध/ताशा-१/कावि/१८७४/१६, दि.२१.०९.२०१६

प्रस्तावना :-

मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, हिंगोली यांनी वरील पत्रान्वये वसमत पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारती बांधकामास प्रशासकीय मान्यता देण्याची विनंती केली आहे.

२. वसमत पंचायत समितीची अस्तित्वातील इमारत जीर्ण व जुनी झालेली असून, प्रशासकीय कामाच्या दृष्टीने अपुरी पडत असून, कामकाजामध्ये गैरसोयीची ठरत आहे. त्यामुळे नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम करण्याकरीता जिल्हा परिषदेने दिनांक ०६.०९.२०१० रोजी ठराव क्र. १७८ व पंचायत समितीने दिनांक १६.१२.२०१० रोजी ठराव क्र. २१९ पारित केला आहे. सदर पंचायत समितीची नवीन प्रशासकीय इमारत बांधकाम सर्वे क्र. १५०/५ या जागेत प्रस्तावित आहे. सदर पंचायत समिती " क " वर्गात मोडते. त्यानुसार अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद हिंगोली यांनी पंचायत समिती वसमत नवीन प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सा.बां.वि. मुंबई यांच्याकडील जॉब नं.TADM/ ५५११, DRG.no-२६ या नमुना नकाशावर आधारीत तळमजला एकूण १०२६.५० चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम प्रस्तावित केले आहे. याकरीता एकूण रू.४३५.०० लक्ष किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक सादर केले आहे. सदर अदांजपत्रक सन २०१५-१६ च्या दरसूचीवर आधारीत असून ते उपअभियंता व कार्यकारी अभियंता, (बांधकाम) जिल्हा परिषद हिंगोली यांनी सांक्षाकीत केले आहे. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी प्रस्तावासोबत जिल्हा परिषद व पं.स.च्या ठरावाची प्रत, नमुना नकाशाची प्रत, जागेचा उतारा, ले-आऊट प्लॅन, साईट प्लॅन,

लिड चार्ट, क्वारी चार्ट, स्थळ दर्शक नकाशा व अस्तित्वातील इमारतबांधकामाचे फोटो इत्यादी कागदपत्रे सादर केली आहेत.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या छाननीअंती वसमत पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या एकूण रुपये २७१.८२ लक्ष किंमतीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

१. वसमत पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या एकूण रुपये २,७१,८२,०००/- (रुपये दोन कोटी एकाहत्तर लक्ष ब्याऐंशी हजार फक्त) इतक्या अंदापत्रकीय किंमतीच्या बांधकामास पुढील अटींच्या अधीन राहून, या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे .

१) नियोजित वसमत पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारत बांधकामाकरीता मुख्य वास्तुशास्त्रज्ञ सा.बां.वि.मुंबई यांच्याकडील जॉब नं.TADM-५५११,DRG.NO.२६, या नमुना आराखड्यानुसार तळमजला एकूण १०२६.५० चौ.मी. क्षेत्रफळाचे बांधकाम हाती घेताना स्थानिक नगर रचना प्राधिकरणाची तसेच, अग्निशामन यंत्रणेची मंजूरी घेणे बंधनकारक राहील.

२) नियोजित वसमत पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे बांधकामाकरीता प्रस्तावित करण्यात आलेल्या आराखड्यात पदाधिकारी यांच्या दालनालगत महिला पदाधिकाऱ्यांसाठी प्रसाधनगृहा-सह विश्रांती कक्षाची व्यवस्था करण्यात यावी.

३) प्रस्तुत प्रशासकीय इमारत बांधकामामध्ये ग्रीन बिल्डींग संकल्पना अमंलात आणून, नैसर्गिक प्रकाशयोजना व वायुविजन, पाण्याच्या व उर्जेच्या वापरात काटकसर, पर्जन्य जलपुनःभरण आणि जास्तीत जास्त पर्यावरणपूरक बांधकाम साहित्य व साधन-सामुग्रीचा वापर करणे आवश्यक राहील.

४) प्रत्यक्ष बांधकाम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र. इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१, दिनांक १० जानेवारी, २०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात यावी.

५) प्रस्तुतचे काम हाती घेतल्यापासून जास्तीत जास्त दोन वर्षात पूर्ण होईल, असे नियोजन करुन, इमारत बांधकामाचा त्रैमासिक प्रगती अहवाल वेळीच शासनास पाठविण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.) जिल्हा परिषद यांनी दक्षता घ्यावी.

६) या प्रकरणी सुधारीत प्रशासकीय मान्यता दिली जाणार नसल्याने, मंजूर प्रशासकीय मान्यता किंमतीतच काम पूर्ण करण्याची संबंधित कार्यकारी अभियंता (बांध.), जिल्हा परिषद

यांनी दक्षता घ्यावी. या कामावर प्रशासकीय मान्यते पेक्षा अधिक खर्च झाल्यास तो पंचायत समिती / जिल्हा परिषदेने सोसावा.

(७) प्रस्तुत प्रशासकीय इमारतीमध्ये अपंगांना सोयी-सुविधा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने रॅम्प, रेलींग व तत्सम सुविधा निर्माण करणे बंधनकारक राहील.

२. वसमत पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाचा सविस्तर अंदाजपत्रकाचा सर्वसाधारण गोषवारा खालीलप्रमाणे आहे.

FINAL ABSTRACT FOR CONSTRUCTION OF VASMAT P.S. ADMIN., BLDG.		
Sr.No	**Description of item**	**Cost Rs.**
1	Cost of Main Building	20437480.00
2	Add 11% for Electrification	2248123.00
3	Add 8 % for Water Supply & Sanitation	1634998.00
4	Add 2 % for Rain Water Harvesting & Fire Fighting	408750.00
5	Add 6 % for Price Variation Charges	1226249.00
6	Add 4 % for Contingencies	817499.00
7	Add 2 % for Computerization	408750.00
	TOTAL Rs	27181848.00
	SAYS Rs	27182000.00

३. उपरोक्त प्रशासकिय इमारत बांधकामासाठी संबधित सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त झाल्यानंतर अनुदान स्वरुपात टप्प्या-टप्प्याने निधी उपलब्ध करुन दिला जाणार असून, तो उपलब्धतेनुसार अर्थसंकल्प वितरण प्रणाली (BDS) द्वारे वितरीत करण्यांत येईल. यावरील खर्च "२५१५-इतर ग्रामीण विकास कार्यक्रम १०१, पंचायती राज ३१ सहाय्यक अनुदाने (०१) (०३) जिल्हा परिषदांच्या इमारती बांधकामासाठी जिल्हा परिषदांना सहाय्यक अनुदाने (२५१५ ००५३)" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. या कामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याकडुन त्वरेने तांत्रिक मान्यता घेण्यात येवून त्याची प्रत शासनास सादर करावी.

५. प्रस्तुतचा शासन निर्णय, वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग-पांच, अ.क्र.१ महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेतील परि.क्र.१३४ खाली प्रशासनिक विभागास प्रदान करण्यांत आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यांत येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०३२६१०१०१६२९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Dilip Babasaheb Patil

Digitally signed by Dilip Babasaheb Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Rural Development And Water Conservation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e461e0a32ec649f0a60e4372f7cbbb3edff433d33cc0d95db6f8dbf1fa4f7f, cn=Dilip Babasaheb Patil
Date: 2018.03.26 15:54:21 +05'30'

(दि.बा.पाटील)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.विरोधी पक्षनेता विधानसभा/विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
२) विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग.
३) महालेखापाल, महाराष्ट्र -१ मुंबई / महाराष्ट्र -२, नागपूर.
४) मुख्य अभियंता, प्र.मं.ग्रा.स.यो.,कॅम्प ऑफिस, मध्यवर्ती इमारत, पुणे
५) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली
६) अति. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली
७) मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली
८) कार्यकारी अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद, हिंगोली
९) जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा हिंगोली
१०) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा हिंगोली
११) उपमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा कोकण विभाग, नवी मुंबई
१२) जिल्हा लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, हिंगोली
१३) सभापती, पंचायत समिती, वसमत, जिल्हा हिंगोली
१४) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, वसमत, जिल्हा हिंगोली
१५) निवड नस्ती,कार्यासन क्र.बांधकाम-४,ग्राम विकास विभाग,मंत्रालय, मुंबई